Jagdamba Education Society's

Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

Date: 06/05/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

News Paper Name: आपलं महानगर

Page No. 04

# दिनविशेष

## प्रसिद्ध चरित्र लेखिका वीणा गवाणकर



वीणा गवाणकर या मराठी साहित्यातील अद्वितीय चरित्र लेखिका आहेत. त्यांचा जन्म ६ मे १९४३ रोजी पुण्याजवळच्या लोणी, काळभोर येथे झाला. त्यांनी पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयामधून पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुणे विद्यापीठातून ग्रंथपाल पदवी प्राप्त केली. १९६४ मध्ये त्या मिलिंद महाविद्यालय, औरंगाबाद येथे ग्रंथपाल म्हणून रुजू झाल्या. चरित्रपर लेखन माध्यमांतून केलेला मुक्तसंचार, योग्य रचना, विलक्षण मोहक भाषा आणि लेखणीचा धीटपणा अशा अनेक रास्त कारणांमुळे लेखिका वीणा गवाणकर सर्वांना जवळच्या आहेत.'एक होता कार्व्हर' त्यांच्या लेखिका प्रवासातील सर्वात पहिलं व वाचकांकडून खूप प्रसिद्धी मिळालेलं पुस्तक आहे. या पुस्तकाच्या आतापर्यंत ४१ आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. या पुस्तकाला १९८१-८२ चा महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कारसुद्धा मिळाला आहे.

वीणाताईंनी आतापर्यंत १२ पुस्तके लिहिली आहेत. 'एक होता कार्व्हर', 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', 'डॉ. आयडा स्कडर', 'डॉ. खानखोजे', 'डॉ. सलिम अली', 'लीझ माईटनर', 'रोझलिंड फ्रँकलीन', 'सर्पतज्ञ डॉ.रेमंड डिटमार्स', 'रॉबी डिसिल्व्हा', 'भगीरथाचे वारस ' या पुस्तकांच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील महान व्यक्तींची ओळख वीणाताईंनी मराठी माणसाला करून दिली. वीणाताईंनी कृषी, पर्यावरण, पाणी, वैद्यकीय, राजकीय, संशोधन अशा विविध क्षेत्रातील महान, पण समाजाकडून उपेक्षित राहिलेल्या व्यक्तींना पुस्तकाच्या माध्यमातून प्रकाश झोतात आणले. त्यांचा असामान्य, संघर्षमय जीवनप्रवास वाचकांपर्यंत पोहोचवला. त्यांना तीन वेळा महाराष्ट्र शासनाचा वाङ्मय पुरस्कार मिळाला आहे. कोकण मराठी साहित्य परिषदेचा धनंजय कीर पुरस्कार आणि मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचा कै. प्रा. वि. ह.कुलकर्णी पुरस्कार आदी पुरस्कारांसह २०१४ मध्ये एस.एन.डी.टी. विद्यापीठातर्फे वूमन ऑफ दी इयर या पुरस्काराने त्यांना सन्मानित केले आहे.

Nashik Edition

May 06, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401